International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Peer Reviewed Bi-Monthly Vol.4 No.4 March - April 2017

# वाडा चिरेबंदी नाटक - एक आकलन

## महेश एलकुंचवार

**डॉ. बाळासाहेब खोमणे**
मराठी विभाग
एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई.

महेश एलकुंचवार हे मराठी नाट्य विश्वातील प्रमुख आधारवड. त्यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील पारवा या गावी झाला. बालपणीच त्यांना शिक्षणासाठी गाव, घर सोडावे लागले. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाला. कुटुंबापासून तुटलेपणाची भावना व एकाकीपणाची जाणीव त्यांच्या मनात घर करून राहिली. गाव, घर या पासून दूर राहिल्याने वाचनाची व चित्रपट पाहण्याची आवड त्यांच्या मनात निर्माण झाली. पुढे त्यांनी नागपूर विद्यापीठातून इंग्रजी एम.ए. केले व नागपूर विद्यापीठातील धरमपेठ महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन केले. सुलतान ही त्यांची पहिली कलाकृती १९६७ सालच्या सत्यकथेच्या अंकात प्रसिद्ध झाली त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. सुलतान व इतर एकांकिका व यातनाघर हे त्यांचे एकांकिका संग्रह फार प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या एकांकिकेचे विशेष म्हणजे, “जीवनातील व्यर्थतेचा, दुःखाचा, अस्तित्वाशीच जडून असलेल्या एकाकीपणाचा आणि विरक्ततेचा अनुभव हे सर्वच एकांकिकेतील मुख्य सूत्र आहे”.[१]

महेश एलकुंचवार यांनी रुद्रवर्षा हे नाटक १९६८ मध्ये लिहिले त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. गार्बो, वासनाकांड,पार्टी, वाडा चिरेबंदी, प्रतिबंध, आत्मकथा, आणि युगांत अशी एकापेक्षा एक सरस नाटके मराठी रंगभूमीला दिली.

‘वाडा चिरेबंदी’ हे महेश एलकुंचवार यांचे अतिशय गाजलेले व पसिद्ध नाटक आहे. या नाटकामध्ये खेडेगावातील एका ब्राह्मण कुटुंबाची कथा सांगितलेली आहे. धरणगाव नावाच्या विदर्भातील एका खेडेगावातील देशपांडे नावाच्या ब्राह्मण वतनदाराच्या कुटुंबात हे नाटक घडते. या घराचे कुटुंबप्रमुख तात्या. तात्यांचा फार रुबाब. तात्यांचे निधन झाल्यानंतर कुटुंबात संपत्तीसाठी संघर्ष सुरु होतो. तात्यांना चार मुले आहेत. भास्कर, सुधीर, चंदू व प्रभा ही आहेत. थोरला मुलगा भास्कर याला सर्व संपत्ती हवी आहे. सुधीर मुंबईत राहात असला तरी त्यालाही या

संपत्तीत वाट हवा आहे. तिसरा मुलगा चंदू याचा संपत्ती संदर्भात कोणीही विचार करीत नाही. चौथी मुलगी प्रभा हिला उच्च शिक्षण घ्यावे वाटते.

या घराचे कर्ते पुरुष तात्या. तात्या देशस्थ ब्राह्मण. खूपच मोठे जमीनदार. तात्या जिवंत असतांना घरातील सर्व निर्णय तात्या घरत असत. त्यांनी सांगितलेली गोष्ट अंतिम असे. कधीकाळी विदर्भातले बडे जमीनदार असलेल्या धरणगावकर देशपांडय़ांचं ते वैभव बदलत्या काळाबरोबर लयास गेलं आहे अशा कालखंडात हे नाटक घडतं. त्यांनी आयुष्यभर कष्ट केले नाहीत. त्यांचा खूपच दरारा होता. या काळात वैभव नष्ट होत गेले परंतु सरंजामी वृत्ती मात्र गेली नाही. त्यांचे निधन झाल्यावर घरातील प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळाल्यासारखे वाटते. प्रत्येक व्यक्ती आपल्या मनात आहे, तसे वागण्याचा विचार करतो. तात्यांच्या हयातीत घरातल्या कुणाचंच त्यांच्यापुढे चालत नसे. तात्यांच्या जाण्यानं घरावर सुतकी कळा असली तरी आईशिवाय इतरांना फारसं दु:ख झालेलं नाही. उलट त्यांच्या जाण्यानं सर्वांनी काहीसा सुटकेचा नि:श्वास सोडलेला. तात्यांचा थोरला मुलगा भास्कर याला संपूर्ण जमीन हवी आहे, त्यासाठी त्याची धडपड सुरु आहे. घरासाठी आपण संपूर्ण आयुष्य खर्च केले त्यामुळे सर्व संपत्ती व दागिने आपणास मिळावेत, ही त्याची इच्छा आहे. दोन नंबरचा मुलगा सुधीर मुंबईत नोकरी करतो त्यालाही गावाकडील संपत्तीत हिस्सा हवा आहे. चंदुला दुकान टाकायचे आहे. त्यासाठी त्याला संपत्ती हवी आहे. मुलगी प्रभा हिचे प्रतिष्टा जपण्यासाठी तात्यांनी उच्च शिक्षण होऊ दिले नाही. मनासारखे लग्नाचे स्थळ मिळत नाही म्हणून सर्व दागिने आपणास मिळावे अशी इच्छा प्रभाची आहे. दागिने मोडून उच्च शिक्षण तिला घ्यायचे आहे. तात्यांच श्राद्ध जमीनदारांच्या / सरंजामदार यांच्या प्रतीष्ट्येला शोभेल असं व्हायला हवं असं भास्करला वाटते. गावातील दुकानदाराची उधारी थकल्यामुळे तो आणखी उधार द्यायला तयार नाही. तो वाणी उधारी व श्राद्धाच समान देण्यासाठी वाड्याच्या मागच्या बाजूची जमीन विकत द्या असे सांगतो. ती जमीन विकून येणाऱ्या पैशांत श्राद्धविधी उरकायची तजवीज भास्करनं आधीच करून ठेवलीय. सुधीरला मात्र ही गोष्ट मान्य नाही. सुधीर आपल्या खिशातून एकही पैसा द्यायला तयार नाही. शेवटी आई वाड्याच्या मागील भाग विकायला संमती देते. तिला घरातली भांडणं चव्हाटय़ावर आणायची नाहीत. तात्या गेल्यावर परस्वाधीन झालेल्या आईला काळजी आहे ती चंदू आणि प्रभाची तात्यांची वृद्ध आईला तात्या गेलेत हे समजत नाही. ती अंथरुणाला खिळून आहे. तात्यांचे निधन झाले हे तिला समजत नाही. ती सतत त्यांच्या नावानं हाका मारत असते. भास्कराला दोन मुलं आहेत. मुलगा पराग व मुलगी रंजू. पराग अर्धवट शिक्षण सोडून गावभर उनाडक्या करीत फिरतो. तो व्यसनी बनला आहे. त्याला दारूचे वेद लागले आहे. मुलगी रंजू हिला

चित्रपट, गाणे यांचे प्रचंड वेड आहे. ती ज्या शिक्षकाकडे शिकवणीला जाते, त्याच्याबरोबरच पळून जाते. शेवटी सुधीर तिला शोधून आणतो. भास्करची बायको घरातली मोठी सून. तिला वाटते मी मोठी असल्याने आपलीच घरावर सत्ता आहे. या देशस्थ कुटुंबात सुधीरची बायको अंजली ही कोकणस्थ असल्यानं देशस्थांच्या या घरात तिला गुदमरल्यासारखं होतं. तिला नेहमी कोकणस्थ मानहानीकारक वागणूक मिळते. नाटकाचे कथानक आणि पात्रे पाहता कथानक अतिशय लहान परंतु नाटकातील पात्र सख्या मर्यादित असतानाही हे नाटक यशस्वी का झाले? याचे रहस्य या पात्रांच्या वर्तनात आणि स्वभावात दडले आहे. या पात्रांचा संघर्ष बाह्य स्वरूपाचा नाही. त्यांचा संघर्ष हा स्वतःशीच चालला आहे. प्रत्येकाच्या मनात संपत्तीची ओढ आहे. पण प्रत्यक्ष व्यक्त होतांना दिसत नाहीत. त्यातून ते दु:खी होतात. उदा. प्रभाचे दु:ख हे शिकलो नाही म्हणून योग्य लग्नाचे स्थळ मिळाले नाही ही जाणीव सदोदित जाणवते. तात्या गेल्यावरच ती व्यक्त होते.थोडक्यात "एलकुंचावारांच्या नाटकांमध्ये कथानकापेक्षा अनुभवांना आणि ते घेणाऱ्या पात्रांच्या मतांना महत्व असते"[२] या नाटकातील कुटुंब व्यवस्था प्रातिनिधिक आहे. पारंपरिक वाडा जसा उध्वस्त होत जातो तसे कुटुंब व्यवस्था व परस्पर नातेसंबंध नष्ट होत आहेत. ढासळत्या जीवन मूल्यांचे चित्रण या नाटकात आले आहे. "जुने नष्ट होत आहे. आपण स्वतःही कोसळत आहोत. त्याच वेळी नवे निर्माण होत आहे. ते स्वीकारताना होणारी उलघाल तान अत्यंत संयमितपणे व्यक्त करण्यात महेश एलकुंचवार यशस्वी झालेले दिसतात"[३]

वाडा चिरेबंदी या नाटकात महेश एलकुंचवार यांनी १९८० पूर्वीचे जमीनदारी/सरंजामशाहीचं प्रतीक असलेल्या 'वाडा संस्कृती'चे चित्रण केले आहे. या नाटकात महेश एलकुंचवार यांनी या नाटकात परिवर्तन काळातील सामाजिक आर्थिक समस्यांचे चित्रण केले आहे. जुन्या काळात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती त्यामुळेच तात्यांच्या काळात एकत्र असलेले कुटुंब आज फुटीच्या उंबरठ्यावर उभे आहे. याचे कारणही स्पष्ट आहे. प्रत्येकाला संपत्ती हवी आहे(सुधीर, भास्कर, चंदू,प्रभा) तर काहींना अधिकार हवे आहेत( भास्करची पत्नी) परंतु यासाठी कोणीही त्याग करायला तयार नाही. यातूनच प्रत्येकाचे नाते - भावसंबंध ताणले गेले आहेत. डॉ. राजन गवस लिहितात, "खेड्यातील कोणतीच व्यक्ती सुटी, एकटेपणाने जगू शकत नाही. ती घराशी, गोतावळ्याशी, समाजाशी, गावाशी, पंचक्रोशीशी बांधली गेलेली असते...... यातून जन्म पावलेला 'व्यापक समूहभाव' हे खेड्याच्या जगण्याचे महत्वाचे मूल्य. येथे जगण्याचे महत्वाचे मूल्य. येथे जगणे समूहाने. या समूहात 'फक्त माणूस' ही कल्पना अमान्य.......पाचामुखी परमेश्वर हाच

न्याय.... जगण्यात न्यायावर माणसावर श्रद्धा.... या कृषीजन संस्कृतीच्या मूल्यव्यवस्थच्या शहरात आकाराला आलेली असते एकटेपणा ही थोर गोष्ट. व्यक्तीकेंद्री जगणे .. यातून येणारी महत्वाचे....... या एकटेपणातून जे मिळाले पाहिजे ते मला एकट्याला. 'ओरबडण्याची वृत्ती' जे जे मिळेल ते ते मिळवण्याचा ध्यास. डॉ. राजन गवस यांनी वरील विवेचनातून जो विचार मांडला आहे तो म्हणजे 'उपयुक्ततेतून शोषण' हा होय. उपयुक्ततेतून शोषणाचा बळकट विचार येथे मूळ धरतो".[४] ही खेड्याशी संबंधित संकल्पना असली तरी या नाटकात जे जे मिळेल ते ते मिळवण्याचा ध्यास. हा प्रयत्न प्रत्येक पात्र करीत आहे. आधुनिक काळातील या वृत्तीचे चित्रण वाडा चिरेबंदी या नाटकात पाहायला मिळते

'वाडा चिरेबंदी' हे नाटक बदलती मूल्य व्यवस्था मांडते. येथे जुन्या नव्यातील संघर्ष स्पष्ट दिसतो. या संघर्षातून मोडकळीला आलेली कुटुंब व्यवस्था जाणवते व कुटुंबसंस्थेचं भविष्यातील वास्तवदर्शी चित्रण 'वाडा चिरेबंदी' हे नाटकात आले आहे. जो वाडा चिरेबंदी होता ज्यात रूढी, परंपरा, नातेसंबंध, आपलेपणा या गोष्टी जपल्या जात होत्या, त्यालाच तडे जातांना दिसतात. या वाड्यातील माणसांचे नातेसंबंध एव्हढे ताणले गेले आहेत की, कधीही हा वाडा जमीनदोस्त होऊ शकतो.

संपूर्ण मराठी नाटकांचा विचार केला तर हे नाटक रंगभूमीवर आले तेंव्हा नाटकात कथानक महत्वाचे मानल्या जाणाऱ्या काळात आशयाची उकल करणारे नाटक म्हणून या नाटकाकडे पाहिले गेले. वाडा संस्कृतीत झालेले बदल त्यांनी वास्तवदर्शी पद्धतीने मांडले. याचे कारण महेश एलकुंचवार हे जमीनदार आहेत. त्यांनी ही संस्कृती प्रत्यक्ष अनुभवली. होणारे बदल त्यांच्या लक्षात आले. तेच बदल त्यांनी टिपले त्यामुळे ही साहित्यकृती नाट्यप्रकारातील उत्कृष्ट साहित्यकृती ठरली आहे. म्हणूनच "या कालखंडात मराठी रंगभूमीवर आशय संपन्नता आणि सांस्कृतिक नवता कोणी आणली असेल तर ती महेश एलकुंचवार यांनी"[५] त्यांच्या नाटकातून मानवी मानवी मूल्याशी व संस्कृतीशी निगडीत नाट्यानुभव आकारास येतो.

एकूणच हे मराठी रंगभूमीवरील उत्कृष्ट नाटक आहे. जुन्या व नव्या मूल्यव्यवस्थेतील संघर्ष अतिशय संयमितपणे महेश एलकुंचवार यांनी चित्रित केला आहे. आधुनिक काळातील बदलत्या सरंजामी व्यवस्थेचे चित्रण हे नाटक करते. स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जीवनातील परिवर्तनाचा वेध घेण्याचा प्रयत्न नाटककाराने केला आहे. ग्रामीण जीवनात अनेक परिवर्तने आली त्यात नागरीकरणाचा आणि यंत्र संस्कृतीचा वाटा फार मोठा आहे. खेडे बदलायला सुरुवात झाली.

पारंपरिक मूल्य व्यवस्था मोडकळीला आली. चकाकत्या नागरी जीवनाचे आकर्षण वाढले. भौतिक सुखाची आस लागली. श्रम प्रतिष्ठा लयाला जावू लागली. एकत्र कुटुंब पद्धतीचा नाश होवू लागला या सर्व गोष्टी नाटकात चित्रित झाल्या आहेत.

**संदर्भ :**


१. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड, संपादक, प्रभा गणोरकर व इतर, प्रकाशक जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई. प.आ. २००४ पृष्ठ क्र. ८७

२. प्रदक्षिणा, मराठी नाटक १९७५ ते १९९५, अनंत कान्हो, संपादन अनिरुद्ध अनंत कुलकर्णी,प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, प्रथमावृत्ती : १९९१, पुनर्मुद्रण : २०१२, पृष्ठ क्र १००

३. प्रदक्षिणा, मराठी नाटक १९७५ ते १९९५, अनंत कान्हो, संपादन अनिरुद्ध अनंत कुलकर्णी,प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, प्रथमावृत्ती : १९९१, पुनर्मुद्रण : २०१२, पृष्ठ क्र १०१

४. कैलास सार्वेकर, तहान स्वरूप आणि समीक्षा, (राजन गवस), प्रकाशक प्रशांत पब्लिकेशन, प्र.आ. २००३ पृ. ३५,३६

५. प्रदक्षिणा, मराठी नाटक १९७५ ते १९९५, अनंत कान्हो, संपादन अनिरुद्ध अनंत कुलकर्णी,प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, प्रथमावृत्ती : १९९१, पुनर्मुद्रण : २०१२, पृष्ठ क्र १००